महाराष्ट्र शासन
# उपविभागीय अधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालय
बस स्टॅड समोर, धानोरा रोड गडचिरोली पीन- 442 605
दुरध्वनी क्र. 07132- 233015 Email ID : sdogad.gadchiroli@gamil.com

क्रमांक : कार्या/शिरस्तेदार/कावि/169/2023 दिनांक :24 / 01 /2023

## *प्रारंभिक अधिसुचना*
## *(दिनांक 24 जानेवारी, 2023)*

**न्याय नुकसान भरपाई मिळण्याचा आणि भुमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, 2013 अन्वये कलम 11(1) खालील अधिसुचना.**

ज्याअर्थी कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे पत्र जा.क्र.गोंवीग/कुसका/514/2023 दि.17.1.2023 नुसार मौजा अडपल्ली येथील येथील खाजगी जमीन वाटाघाटीने अधिग्रहणाच्या प्रकरणात संपादन करण्यास शिल्लक 32.79 हे.आर जमीन मिळणेकरीता भूसंपादन अधिनियम, 2013 च्या कायदायान्वये भूसंपादन करण्याबाबत प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना सादर केला. त्यानूसार मा.जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे पत्र क्र. कार्या-8/अ.का/भुसंपादन /कावि/83/2021, दिनांक 23/01/2023 नुसार विशेष भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, गडचिरेली यांना सदर प्रस्ताव सादर करून भूसंपादन कार्यवाही पार पाडण्यास निर्देशीत केले आहे. न्याय नुकसान भरपाई मिळण्याचा आणि भुमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, 2013 नुसार जिल्हाधिकारी यांची कर्तव्य पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, गडचिरोली यांना विशेष भूसंपादन अधिकारी म्हणून मा.जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे आदेश क्र.कार्या-8/अ.का./भूसंपादन/कावि/335/2015 दि.29.06.2015 अन्वये प्राधिकृत केले आहे.

ज्याअर्थी न्याय नुकसान भरपाई मिळण्याचा आणि भुमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, 2013 (30 of 2013) च्या कलम 3 मधील पोट कलम (3) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र शासनाने महसूल व वनविभाग अधिसुचना क्रमांक MIS-11/2014/C.R 77/A-2 दिनांक 19 जानेवारी 2015 (यानंतर पुढे याला सदर्हु अधिसूचना संबोधण्यात यावे) अन्वये सार्वजनिक प्रयोजनार्थ जमीन संपादन करताना (सदर्हु कायदयाच्या कलम 3 मधील पोटकलम (झेड अ) नुसार जिल्हयातील 500 हेक्टर पेक्षा जास्त नसलेल्या जमीनीच्या बाबतीत त्या जिल्हयाचा जिल्हाधिकारी यांना या कायद्या अंतर्गत जमीन संपादन करण्यास शासनाच्या वतीने समुचित शासन म्हणुन घोषीत करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी या अधिसूचनेनुसार जिल्हाधिकारी यांना शासनाच्या वतीने समुचीत शासन म्हणुन घोषीत करण्यात आले आहे, त्याअर्थी अनुसूची I मध्ये दर्शविलेल्या जमीनी (या पुढे याचा उक्त भुमी उल्लेख असा करण्यात येईल) अनुसूची II मध्ये नमुद केलेल्या सार्वजनिक प्रयोजनाकरीता आवश्यक आहे. किंवा आवश्यक असल्याचे संभव आहे. (यापुढे याचा उल्लेख उक्त सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात येईल)

याबाबत जिल्हाधिकारी गडचिरोली यांची समुचित शासन म्हणुन खात्री झाल्यामुळे सदर्हु कायद्याच्या कलम 11 च्या पोटकलम 1 नुसार सार्वजनिक कामाचे प्रयोजनासाठी जमीन संपादन करण्यात येते असे अधिसूचित करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी सदर्हु भुमीसंपादन कायद्यानूसार सार्वजनिक प्रयोजनार्थ भूमी संपादीत करताना भुधारकास विस्थापीत करण्याचे कारण सोबत जोडलेल्या अनुसूची III मध्ये नमुद केलेले आहे.

आणि ज्याअर्थी भुमीसंपादन कायद्यातंर्गत सार्वजनिक प्रयोजनार्थ भुमीसंपादन करताना सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश सोबत जोडलेल्या अनुसूची IV मध्ये नमुद केलेला आहे.

आणि ज्याअर्थी या भूमीसंपादन कायद्याचे कलम 43 पोट कलम (1) नुसार विस्थापितांचे पुनर्वसन व पुर्नस्थापना करण्याकरीता सोबत जोडलेल्या अनुसूचि V मध्ये प्रशासकाचे विवरण नमुद केलेले आहे. (प्रशासकाची नियुक्ती आवश्यक असल्यास अनुसूची V मध्ये मध्ये माहीती देणे आवश्यक आहे)

त्याअर्थी सदर्हु कायद्याच्या कलम 11 चे पोट कलम (4) नुसार अधिसुचना प्रसिध्द कैल्याच्या दिनांका पासुन सदर्हु भुमी संपादन कायद्याच्या प्रकरण 4 खाली कार्यवाही पुर्ण होई पर्यंत कोणतीही व्यक्ती उक्त जमीनीचा अथवा जमीनीच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा कोणताही व्यवहार करविणार नाही किंवा अश्या जमीनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतू जिल्हाधिकारी अशा प्रकारे अधिसूचीत केलेल्या भुमीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परीस्थितीमध्ये या पोट कलमाच्या अंमलबजावणी मधून अशा भूमी मालकास सुट देऊ शकेल.

परंतु आाणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने, या तरतूदीचे जाणीवपूर्वक उल्लंघन केल्यामूळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची अथवा क्षतीची जिल्हाधिकारी व्दारे भरपाई देण्यात येणार नाही.

पुन्हा असे घोषीत करण्यात येते की, सदर्हु भुमी संपादन कायद्याचे कलम 11 च्या पोट कलम (5) अन्वये जिल्हाधिकारी भुमी संपादन, पनर्वसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम 2014 (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त नियम असा करण्यात येईल) चे नियम 10 उपनियम (3) अन्वये भूमी अभिलेख अद्यावत करण्याचे काम हाती घेतील.

त्याअर्थी समूचित शासन म्हणून जिल्हाधिकारी सदर्हु कायद्याचे कलम 3 पोट कलम(ग) अन्वये उपविभागीय अधिकारी, गडचिरोली यांना कर्तव्ये पार पाडण्यास प्राधिकृत कलेले आहे.

## अनुसुची I

### संपादीत करावयाच्या जमीनीचे वर्णन

### गावाचे नाव :- अडपल्ली, ता. जि. गडचिरोली त.सा.क्र. 04

| अ. क्र. | भुधारकाचे नाव | सर्व्हे क्रमांक | एकुण क्षेत्र (हे. आर.) | संपादनाखालील क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | भाष्कर शंकरराव झोटींग | 137/ब/2 | 0.83 | 0.83 |
| 2 | इश्वर हरीजी चौधरी व इतर | 143 | 0.72 | 0.72 |
| 3 | मानकु मोना चौधरी व इतर | 144 | 0.54 | 0.54 |
| 4 | इश्वर हरिजी चौधरी व इतर | 147 | 0.48 | 0.48 |
| 5 | नरेंद्र तिमाजी निजाम व इतर | 142 | 1.08 | 1.08 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6 | लिलाबाई भोजु पाल वइतर | 152/1 | 1.39 | 1.39 |
| 7 | भाष्कर शंकरराव झोटींग व इतर | 138/अ/1 | 1.16 | 1.16 |
| 8 | सचिन दिनकर झोटींग | 138/ब/1 | 0.86 | 0.86 |
| 9 | सानिल सचिन झोटिंग | 138/ब/2 | 0.85 | 0.85 |
| 10 | हेमपुष्पा वासुदेव चुधरी व इतर | 194 | 4.05 | 4.05 |
| 11 | अ.पा.क. आई निरुपना संजय भांडारकर | 235/1 | 1.01 | 1.01 |
| 12 | संस्कार संस्कृती बहुउद्येशीय संस्था गड तर्फे अध्यक्ष संजय राधेशाम भांडारकर | 235/2 | 1.01 | 1.01 |
| 13 | दिवाकर मोतीराम राउत व इतर | 238 | 1.05 | 1.05 |
| 14 | इश्वर हरीजी चौधरी व इतर | 239 | 1.42 | 1.42 |
| 15 | सुरेश मनीराम भोयर व इतर | 255/2 | 1.07 | 1.07 |
| 16 | रमेश विठोबा मेश्राम व इतर | 255/4 | 1.21 | 1.21 |
| 17 | चंद्रकला रामदास टिंगुसले व इतर | 255/5 | 1.21 | 1.21 |
| 18 | शालिकराम पुंडलिक खेवले व इतर | 250/1 | 1.20 | 1.20 |
| 19 | गुणाबाई शिवराम बावनवाडे | 252/1 | 1.39 | 1.39 |
| 20 | फुलचंद हिरामन लाडे व इतर 11 | 253 | 1.53 | 1.53 |
| 21 | सेवंताबाई धोंडु मेश्राम व इतर | 256/2 | 0.70 | 0.70 |
| 22 | रमेश जोगा वनकर व इतर | 256/3 | 1.20 | 1.20 |
| 23 | बाबुराव गंगाराम गडसुलवास व इतर | 266/1 | 0.18 | 0.18 |
| 24 | मंजुळाबाई कवडु जवादे व इतर | 265/1 | 0.27 | 0.27 |
| 25 | हिवराज महादेव चापले | 264/1 | 0.19 | 0.19 |
| 26 | हिवराज महादेव चापले | 263 | 0.31 | 0.31 |
| 27 | माधव सुखरु मेश्राम व इतर | 262/1 | 0.64 | 0.64 |
| 28 | दत्तु बाबुराव कळमकर व इतर | 260/1 | 0.62 | 0.62 |
| 29 | प्रदिप कृष्णराव नगराळे | 259/1 | 0.81 | 0.81 |
| 30 | प्रदिप कृष्णराव नगराळे | 259/2 | 0.79 | 0.79 |
| 31 | शशिकांत विठ्ठलराव चन्नावार | 259/3 | 0.79 | 0.79 |
| 32 | प्रदिप कृष्णराव नगराळे | 259/4 | 0.38 | 0.38 |
| 33 | प्रदिप कृष्णराव नगराळे | 259/5 | 0.39 | 0.39 |
| 34 | प्रदिप कृष्णराव नगराळे | 259/6 | 0.38 | 0.38 |
| 35 | मदन महादेव वरगंटीवार व इतर | 259/7 | 0.38 | 0.38 |
| 36 | रेमाजी पुंडलिक खेवले व इतर | 258/1 | 1.50 | 1.50 |

## अनुसूची II
## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाचे विवरण

प्रकल्पाचे नाव :- गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली करीता खाजगी जमीन भूसंपादन.

प्रकल्पाचे कामाचे विवरण :- विद्यापीठाचे शैक्षणिक व भौतिक विकासाकरीता.

प्रकल्पाचे समाजाला होणारे फायदे :- चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शिक्षणाकरीता लाभ होणार आहे.

## अनुसूची III

प्रकल्प बाधितांना विस्थापीत करणे :- प्रकल्पाने भुधारक विस्थपित होत नाही.
आवश्यक असल्याबाबतची कारणे- निरंक

## अनुसुची IV

सार्वजनिक निर्धारणाचा सारांश :- 1. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग अधिसुचना असाधारण क्र. 182 दिनांक 07/10/2022 नुसार सामाजिक आघात निर्धारणातून सुट मिळाली आहे.

## अनुसूची V
## नियूक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल

अ. अधिका-याचे नाव पदनाम :- विशेष भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, गडचिरोली

ब. अधिका-याचा कार्यालयीन पत्ता :- बस स्टॅन्ड समोर, धानोरा रोड गडचिरोली ता.जि.गडचिरोली पीन कोड 442605.

क. ज्या आदेशाद्वारे प्रशासकाची नियूक्ती करण्यात आली त्या आदेशाचे विस्तृत विवरण :- मा.जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे आदेश क्र.कार्या-8/अ.का./भूसंपादन/कावि/335/2015 दि.29.06.2015 नुसार उपविभागीय अधिकारी, गडचिरोली यांची विशेष भूसंपादन अधिकारी म्हणून नियूक्ती केली आहे.

संपादनामुळे भुधारक विस्थापित होत नाही त्यामुळे त्यांना विस्थापनाचा लाभ देता येणार नाही. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तीचे पुर्नवसन अधिनियम 1986 व तदनंतर या प्रकल्पाबाबत निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णयानुसार लाभ देण्यात येतील.

टिप :- याबाबत काही आक्षेपे असल्यास या कार्यालयाचे समक्ष लेखी आक्षेप अधिसूचना प्रसिध्द झाल्यापासुन 60 दिवसाचे आत सादर करावे.

ठिकाण :- गडचिरोली
दिनांक :-24/01/2023.

विशेष भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी गडचिरोली

(डॉ. [illegible] घोष, भा.प्र.से.)
विशेष भुसंपादन अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, गडचिरोली